दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार २ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २९५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# गरीबांची कातडी सोलून काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा बीड जिल्ह्यात थैमान !!

**यांना पगारी कमी पडतात का ? जिल्ह्यात कर्मचारी नियंत्रणा बाहेर बडे- बडे अधिकारी साखळी गटात शामील**

**वादळवार्ता /प्रतिनिधि**

बीड जिल्ह्यात नेहमीच कुठे न कुठे लाचलुचपत प्रतिबंध विभागाची कारवाई सुरू असते त्यात गलेलठ्ठ पगार असणारे अधिकारी अडकतात आणि तेही काही हजार लाख रुपयाची लाच घेऊन पुन्हा निर्लज्जासारख स्वतःला अधिकारी म्हणून घेताना काही वाटत नसल का ? ८०% लोकांना यांच्या सारखा नियमित मासिक कमाई नसताना देखील ते लोक हसत खेळत जगतात परंतु नियमित पगार घेऊन सुध्दा पैश्यासाठी लाळ घोटत पळतात. दि. ३१ मे रोजी तहसील कार्यालयातील कोतवाल माने याला एका रेशन दुकानदार यांच्या कडून २० हजार रुपये लाच घेताना पकडले यामधे तहसीलदार यांच्या वतीने कोतवाल पैसे घेत होता असे सांगितले जात आहे. सरकारी कर्मचारी अगदी चतुर्थ श्रेणी कर्मचारी देखील तीस चाळीस हजार महिना उचलतात तर वर्ग एक दोन तर लाखोचा पगार उचलतात तरीही हे लोक भिकारी सारख पैसे का मागत असतील , यांचे असे काय शौक असतात जे अश्या लाच घेऊन गरीबाच्या तळतळाटीचा पैसा घेऊन आपले घर चालवतात , गरीबांची कामे अगदी ७ /१२ आ?नलाईन करायचाय , एखादे प्रमाणपत्र काढायचे आहे , एखाद्या योजनेत सहभागी व्हायचय , सरकारी काम करायचय तर पैसे लागणारच हा अलिखित नियम बनलाय अन तो सगळे अगदी काटेकोरपणे जपतात. हे अधिकारी अगदी लाचारासारख गरीबाची कातडी सोलून काढतात पण ना लाज न लज्जा पैसे घेऊन घर चालवतात मग पगार कश्यासाठी खर यांना कमिशन एजंट म्हणून ठेवाव नाहीतर असे लाच घेताना पकडले तर यांच्या कुटुबियाच्या संपत्ती सह सर्व जप्त करून यांना बडतर्फ करायला पाहिजे. ३१ मे रोजी रात्री एका रेशन दुकानदार कडून २० हजार ची लाच कोतवालाला घेताना पकडले रेशन दुकानदार याच्या वर कारवाई करु नये म्हणून हि लाच घेतली असे सांगितले जात आहे आधी ४० हजार मागितले नंतर तडजोडीत २० हजार ठरले मग ते घेण्यासाठी ३१



मेच्या रात्री एका ढाब्यावर हि रक्कम घेतल्याचे समजते. रात्री उशीरा पर्यंत कारवाई चालू होती. यामधे अभिजीत लक्ष्मण जगताप, पद- तहसिलदार, तहसिल कार्यालय, केज, वर्ग १ व मच्छिंद्र मारुती माने, वय-४५वर्षे, पद-कोतवाल, तहसिल कार्यालय केज, यांच्या वर कारवाई केली असून कोतवाल ताब्यात घेतला असून तहसीलदार फरार आहे कारवाई धाराशीव येथील पथकाने केली आहे. लाच घेताना पकडल्याचे कळाल्यावर रात्री उशीरा पर्यंत तहसील कार्यालयात कसे प्रकार चालतात कोणत्या कामासाठी किती रुपये लागतात अधिकारी कसे काम करतात कोणी किती माया जमा केली अश्या अनेक चर्चाना उधान आले होते तर काही म्हणत होते यांच्या पगारी बंद करून कमिशन एजंट म्हणून नियुक्त केले पाहिजे खरच यांना एवढे मोठमोठे पगार असतानाही हे अधिकारी अस का वागत असतील या बाबतीत खरच चिंतन व्हायला हव

## कु. साक्षी अंबादास गुजर हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**बीड वादळवार्ता**

प्रगती विद्यालय चतुराई नगर,नगर रोड बीड ची *विद्यार्थीनी कु. साक्षी अंबादास गुजर हिने दहावीच्या परीक्षित घ्वघवीत यश संपादन करून 94.60% गुण मिळवले आहेत। तिच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. कु. साक्षी अंबादास गुजर ही सौ रेश्मा गुजर व अंबादास गुजर आजी माजी सरपंच (मंझरी हवेली) यांची कन्या आहे तीन दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत 94.60 % गुण मिळवले आहेत. तिच्या या यशासाथी अजोबा उत्तमराव गुजर , यांनी विशेष परिश्रम घेतले आहे साक्षी ने कठिन पारश्रम आणि सातत्यपूण अभ्यास करून यश मिळवले आहे कु. साक्षी हिने इंग्रजी या विषयात 87, मराठी 76, संस्कृत 95, गणित 93, साइन्स आणि टेक्नोलॉजी 90 आणि



सोशल सायंस 93 असे गुण मिळवत एकून 500 पैकी 473 गुण मिलवले आहेत। तिच्या या यशबद्दल प्रगती विद्यालय संस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण बांगर साहेब संस्थेच्या सचिव सत्यभामाताई बांगर व मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह सर्व समाज बांधव सर्व नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे

## जिल्ह्यात १५ जून रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

**बीड वादळवार्ता**

बीड, दि. 1 :- दि. 4 जून 2024 रोजी सार्वत्रिक लोकसभा मतजोजणी होणार असल्याने व जिल्हयामध्ये लोकसभा विजयी उमेदवारांच्या मिरवणुका, मोर्चे, उपोषणे धरणे अंदोलने या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. दिनांक 2 जून 2024 रोजीचे 00.01 वाजेपासून ते 15 जून 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## मतमोजणी प्रक्रियेविषयी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची मुलाखत

**बीड वादळवार्ता**

बीड, दि.01 : लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची मतमोजणी मंगळवार दिनांक 4 जून रोजी होणार आहे. 39 बीड लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी नाथापूर रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन येथे होणार आहे.या ठिकाणी कशाप्रकारे व्यवस्था करण्यात आली याची माहिती जिल्हा निवडणूक



अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी बीड आकाशवाणीला दिली. आकाशवाणी बीड केंद्राच्या 102.9mhz वरून रविवारी दिनांक 2 जून रोजी सकाळी 8. 40 मिनिटांनी 39 बीड लोकसभा निवडणूक 'मतमोजणी प्रक्रिया व्यवस्था आणि प्रशासनाची तयारी' याविषयी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांची प्रसारित होणार आहे. ही मुलाखत माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर यांनी घेतली. या मुलाखतीत मतमोजणीसाठी सहा विधानसभा मतदार संघानिहाय करण्यात आलेली तयारी, येथील सुरक्षात्मक व्यवस्था, मतमोजणीची प्रक्रिया, माध्यमांसाठी करण्यात आलेली व्यवस्था या सर्व बाबींवर जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी प्रकाश टाकला आहे. तर ऐकायला विसरू नका आपल्या आकाशवाणी बीड केंद्रावरून ही मुलाखत .

## संघर्ष लढा पत्रकार संघ माजलगाव,

माजलगाव येथील संघर्ष लढा पत्रकार संघ कार्यालय येथे श्री रामानंद लड्ढा ज्येष्ठ पत्रकार तुकारामजी बापू येवले ज्येष्ठ पत्रकार विष्णू दादा उगले युवा पत्रकार आनंत घडशिंगे यांचा संघर्ष लढा पत्रकार संघाच्या वतीने शाल श्रीफळ




पुष्पगुच्छ पेढे देऊन मोठ्या उत्साहामध्ये वाढदिवस साजरा करण्यात आला त्याप्रसंगी संघर्ष लढा पत्रकार संघाचे सर्व सहकारी बांधव उपस्थित होते

## सोयगाव तालुक्यात ४२ हजार ३३२ हेक्टरवर खरिपाच्या पेरण्याची तयारी पूर्ण कपाशीचे पेरण्या मध्ये घट होणार कृषी विभागाच्या अहवाल

**वादळवार्ता/सोयगाव**

सोयगाव सह तालुक्यात चारही महसूल मंडळात ४२ हजार ३३२ हेक्टरवर खरिपाच्या पेरण्या होणार असल्याचा अहवाल शनिवारी तालुका कृषी विभागाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे यामध्ये यंदाच्या हंगामात कपाशी ची लागवड कमी होऊन मक्याचा पेरा वाढणार आहे मागील वर्षीच्या कापूस दराच्या झालेल्या कोंडीमुळे यंदा कपाशी लागवडीवर फटका बसणार असून मक्याच्या लागवडीसाठी सोयगाव चा शेतकरी वळाला आहे

मागील वर्षीच्या अती गंभीर दुष्काळात अडकलेल्या सोयगाव चा शेतकरी नवीन खरीप हंगामासाठी सज्ज झाला आहे ४२ हजार ४९८ हेक्टर लागवडी योग्य क्षेत्रापैकी ४२ हजार ३३२ हेक्टरवर सोयगाव तालुक्यात खरिपाच्या पेरण्या होणार आहे दरम्यान यंदाच्या हंगामात ज्वारी सर्वाधिक कमी ६० हेक्टरवर लागवड होण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे रब्बीच्या हंगामात शेतकऱ्यांनी ज्वारीचे विक्रमी उत्पन्न घेतल्याने खरिपाच्या हंगामात सर्वाधिक नीचांकी लागवड ज्वारीची होणार आहे खरिपाच्या हंगामाच्या (ता.०१) पहिल्या च दिवशी सोयगाव तालुक्यात पेरण्या च्या पूर्वतयारी ने वेग घेतला होता त्यामुळे भर उन्हातही शेती शिवार गजबजून गेली होती....

चौकट---सोयगाव तालुक्यासाठी यंदाच्या हंगामात कपाशी बियाण्याचे एक लक्ष ७७ हजार इतक्या पाकिटे मागणी करण्यात आली आहे अद्याप मात्र केवळ ६० टक्के बियाणे उपलब्ध झाले आहे सोयगाव तालुक्यातील कृषी निविष्ठा केंद्रावर बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झालेली आहे

चौकट--सोयगाव तालुक्यात कृषी निविष्ठांचा विक्री वर वॉच ठेवण्यासाठी कृषी विभागाचे एक भरारी पथक तैनात करण्यात आले आहे त्यामुळे भरारी पथक द्वारे सोयगाव तालुक्यातील सर्व कृषी केंद्रांची तपासणी करण्यात येत आहे

कोट--बियाणे खते व कीटकनाशकांच्या बाबतीत गाव पातळीवर घरपोच विक्री करणाऱ्या कुठल्याही अनधिकृत व्यक्तींकडून शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे बियाणे अथवा खते खरेदी करू नये याद्वारे शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची दाट शक्यता असते अशी अनधिकृत व्यक्ती गाव पातळीवर घरपोच विक्री करीत असल्याचे निर्दशनास आल्यास तात्काळ कृषी विभागास संपर्क करावा.- संतोष भालेराव, कृषी अधिकारी पंचायत समिती सोयगाव.

कविता

## शब्द सांत्वनी

सुखदुःखांच्या , लाटेवरती
तडजोड मी करीत राहिलो
आव्हानांच्या वादळाशीही
हस्तांदोलन करीत राहिलो....

झाले मनाविरुद्ध बरेचकाही
तरीही , संयमी सदा राहिलो
जे घडणारे , ते घडतची होते
त्या प्रारब्धा , भोगत राहीलो....

जन्म हा कर्मफल गतजन्मांचे
जाणुनीया मी , भोगत राहिलो
जे , जे भेटले , मज सावरणारे
तेची हात धरून नित्य
चाललो....

आधार ! जगती शब्द सांत्वनी
निष्काम मीच शोधीत राहिलो
सांगा ! शब्दाविण सुख कोणते
तीच याचना मी करीत
राहिलो....

रचना :
९७ / ३१ / ५ /२०२४
#©वि.ग.सातपुते.( भावकवी )
( 9766544908 )

# वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांचा सामूहिक आत्मदहनाचा इशारा

## वीज पुरवठा खंडित असल्यामुळे केळी पिकाच्या झालेल्या नुकसानीला जबाबदार कोण ?

**वादळवार्ता/ देऊळगाव गुजरी**

देऊळगाव गुजरी येथून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या तोरणाळे येथे गेल्या २५ तारखेला आलेल्या चक्रीवादळामध्ये अनेक ठिकाणी शेती शिवार व गावठाण शिवारातील वीज पुरवठा करणारे विजेचे पोल कोसळले असून अनेक ठिकाणी गावठाणच्या पोलचे दुरुस्ती करण झालेले आहेत व काही ठिकाणी कामही सुरू आहेत परंतु गेल्या २५ तारखेपासून शेती शिवारातल वीजपुरवठा खंडित असल्यामुळे शेतकऱ्यांच्या केळी पिकाला तसेच खरीप हंगामाच्या पेरणीसाठी पाणी देणे शक्य होत नसल्याने तोरणाळे येथील १५ ते २० शेतकऱ्यांच्या शेतातील केळी पिकाचे वाढत्या तापमानामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची वारंवार तक्रार वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांनी दिलेली आहे परंतु त्यावर आज पावतो काहीही तोडगा निघालेला नसल्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आज दि. ३१ जून रोजी वीज वितरण कंपनीचे अभियंता यांच्याकडे फत्तेपूर सब स्टेशनला जाऊन लेखी निवेदन देऊन वीज पुरवठा खंडित असल्यामुळे आमच्या शेत पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे आम्हाला पुढील दोन दिवसांतच वीजपुरवठा सुरळीत करून द्यावा अन्यथा दि. २ जून रोजी आम्ही सर्व शेतकरी फत्तेपूर येथे वीज वितरण कंपनीच्या सबस्टेशनला येऊन सामूहिक आत्मदहन करणार असल्याचे सर्व शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे म्हटलेले असून त्याच निवेदनाची एक प्रत पोलीस निरीक्षक साहेब पोलीस स्टेशन फत्तेपूर यांना सुद्धा देण्यात आलेली आहे.

# सोनखेडा येथे डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान

**वडवणी /प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने कृषी विभागामार्फत डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे या अंतर्गत नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती खालील क्षेत्र वाढविण्याचा शासनाचा मानस असून त्या अनुषंगाने खुलताबाद तालुक्यातील सोनखेडा, भडजी येथील शेतकऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले व रासायनिक कीटकनाशके यांच्या अतिवापरामुळे मातीचे आरोग्य व पर्यायाने मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे विविध आजाराचा धोका वाढला आहे पीक उत्पादन खर्चात वाढ होऊन अपेक्षित उत्पन्न मिळत नाही म्हणून पर्यायी नैसर्गिक व सेंद्रिय शेती पद्धतीचा



अवलंब करावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे यांनी केले आहे यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक त्या निविष्ठा गाव पातळीवर उपलब्ध होणार आहेत या योजनेतून शेतकरी गट व शेतकरी कंपनी यांना सहाय्य करण्यात येणार आहे महाराष्ट्र शासन कृषी विभाग अंतर्गत डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत खुलताबाद तालुक्यातील सोनखेडा भडजी येथे शेतकऱ्यांचे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली असून प्रथम गाव सोनखेडा येथे प्रशिक्षण घेण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी पर्यवेक्षक राजेंद्र ठेगळे यांनी केले तर तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे यांनी नैसर्गिक शेती विषयी सविस्तर माहिती दिली तसेच नैसर्गिक शेती आणि सेंद्रिय शेती खालील क्षेत्र वाढवण्याचा शासनाचा महत्त्व असल्याचे तारगे यांनी सांगितले ते पुढे बोलताना म्हणाले की रासायनिक खते व रासायनिक कीटकनाशके यांच्या अतिवापरामुळे मातीचे आरोग्य व पर्यायाने मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे विविध आजारांचा धोका वाढला आहे पीक उत्पादन खर्चात वाढ होऊन अपेक्षित उत्पन्न मिळत नाही म्हणून पर्यायी नैसर्गिक व सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करावा असे आवाहन केले तर नंतर मंडळ कृषी अधिकारी किशोर पाडळे यांनी महिला शेतकरी गटांना सेंद्रिय शेती नैसर्गिक शेती शासन निर्णयाप्रमाणे आपण आपल्या गावामध्ये कोण कोणती उपक्रम घेता येईल याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले यावेळी सरपंच ललिता सोनवणे आत्मा तालुका तंत्रज्ञान कृषी सहाय्यक पल्लवी गायकवाड तंत्र सहाय्यक सचिन गायकवाड कृषी मित्र प्रकाश वाकळे महिला शेतकरी गट अध्यक्ष कावेरी बोरसे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला शेतकरी व पुरुष शेतकरी उपस्थित होते

# अवैध वाळू व्यवसाय विरुद्ध पुरी ग्रामस्थांचं उपोषणसंबंधित अधिकाऱ्यांना वारंवार अर्ज करुन देखील घेतली नाही दखलतहसीलदार सतिश सोनी यांनी देली उपोषण स्थळी भेट

गेल्या दोन महिन्यापासून विनंती केल्या अर्ज केले परंतु याची कोणीही दखल घेतली नाही या वाळू उपसामुळे आमच्या गावावर पाण्याचं मोठं संकट होईल यामुळे आम्ही सर्व ग्रामस्थ आलो आहे यामध्ये लहान मुले महिला वयोवृद्ध नागरिक देखील सहभागी झाले आहे इतक्या उन्हात कोणाच्या जीवाला काही झाल तर याची सर्वस्व जबाबदार प्रशासन राहील
मधुकर मोरे तंटामुक्ती अध्यक्ष

गंगापूर तालुक्यातील पुरी शिवारातील शिवना नदी पात्रातून दोन महिन्यापासून होत असलेला अवैध वाळू उपसा बंद करण्यासाठी रखरखत्या उन्हात महिला पुरुष गावकरी मंडळी सरसावले आहे. दोन महिन्यांपासून प्रशासनास अनेकदा निवेदन देऊन ही कोणी दखल घेत नसल्याने त्रस्त झालेल्या गावकऱ्यांनी आपला मोर्चा नदी पात्रात वळून (३१.मे) शुक्रवार रोजी दहा वाजेपासून उपोषणास बसले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की,मौजे पुरी ग्रामपंचायतने २० फेब्रुवारी २०२४ रोजी गंगापूर तहसीलदार, पोलीस स्टेशन गंगापूर यांना निवेदन देऊन गाव परिसरातून होत असलेली अवैध वाळू उपसा बंद करण्यासाठी निवेदन देऊन मागणी केली होती. त्यानंतर मंडळ अधिकारी तलाठी यांनी पंचनामे केले व दंडात्मक कारवाईसाठी तहसील कार्यलयाला प्रस्तावित केले. यानंतर पुन्हा ग्रामस्थांनी २१ मे २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी ,तसेच वैजापूर चे उपविभागीय अधिकारी ,आणि गंगापूर तहसीलदार, पोलीस निरीक्षक यांना स्पीड पोस्ट द्वारे निवेदन देऊन शिवना नदीतून होत आलेला बेसुमार वाळू उपसा बंद करण्यासाठी मागणी केली .कोणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी दखल घेऊन विनापरवाना वाळू उपसा बंद न केल्याने गावकरी लोकांनी २८ मे २०२४ रोजी पुन्हा अवैध वाळू उपसा बंद करण्यासाठी आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला होता.दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, पुरी शिवारातील शिवना नदी पात्रातून गेल्या दोन महिन्यांपासून बेकायदा विना परवानगी वाळू उपसा जेसीबी ,हायवा डंपर ने प्रचंड प्रमाणात चालू आहे.संबंधित कार्यालयाला तीन चार वेळेस पत्र देऊन पंचनामा करून अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या च्या शेतीवर बोजा चढविण्यासाठी मागणी केली.पुरी गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहीर जवळ वाळूचे मोठमोठे खड्डे केल्याने विहिरीला धोका निर्माण झाला असून विहिरीचे पाणी आटले असून दोन दिवसाआड गावकऱ्यांना पिण्यास पाणी पुरवठा होत आहे.गावाला तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने दोन दिवसात अवैध वाळू उपसा बंद न केल्यास समस्त गावकरी शिवना नदी पात्रात उपोषणास बसणार आहे. असे निवेदनात नमूद केले होते.शेवटी या प्रकरणी प्रशासनाने गावकऱ्यांच्या निवेदन मागणीस केराची टोपली दाखवून दुर्लक्ष केल्याने संतप्त झालेल्या महिला,पुरुष गावकऱ्यांनी शुक्रवारी (३१. मे)रोजी सकाळी नदी पात्र गाठून तापलेल्या वाळूत लहान मुल आणि वयोवृद्ध मंडळी घेऊन उपोषणास बसले होते. यावेळी तहसीलदार सतीश सोनी यांनी स्वतः भेट देऊन नागरिकांची समाज काढण्याचा प्रयत्न केला व घटनास्थळी जाऊन पाहणी देखील केली केले परंतु नागरिक ऐकण्याच्या मनस्थिती नसल्यामुळे आता आमच्यावर विश्वास ठेवा आम्ही योग्य ती कारवाई करू अशीच समाज देऊन नागरिकांनी आणि उपोषण सोडणार नाही परंतु महिलांना आणि उपोषण सोडायला लावू व आम्ही पाच सहा जण या ठिकाणी थांबू असे नागरिकांकडून सांगण्यात आले. यावेळी तहसीलदार सतिष सोनी,मंडळ अधिकारी बाळासाहेब जाधव,तलाठी श्रीराम जोशी, तलाठी सुनील ढोले ,ग्रामसेवक सुप्रिया पवार, तर घटनास्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये त्यासाठी गंगापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजवर शेख, बीट अमलदार अवधूत, विष्णू बापते, पोलीस पाटील अब्बास पठाण ,महात्मा गांधी तंटामुक्त समिती अध्यक्ष मधुकर मोरे,सरपंच, उपसरपंच आणि समस्त ग्रामपंचायत सदस्य,समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आम्ही निवडणुक प्रक्रियेत गुंतलो असल्याचा गैरफायदा घेऊन वाळू उपसा करण्यात आला.
जे वाळू उत्खन करणारे लोक आहे त्यांना प्रतिबंध नोटिसा काढल्या आहे .ज्यांनी स्वतः च्या किंवा दुसऱ्यांच्या शेतातून वाळू उपसा करण्यासाठी मदत केली .त्यांच्या मालमत्तेवर बोजा टाकण्याची प्रक्रिया तहसील ने सुरू केली आहे.
**बाळासाहेब जाधव , मंडळ अधिकारी भेंडाळा**

जे लोक वाळू वाहत होते त्यांना आम्ही खुप वेळा सांगितले आहे वाळू उपशामुळे पाणी कमी झाले आज गावाला पाणी टंचाई च्या झळा सोसाव्या लागत आहे. यापुढे देखील भीषण पाणी टंचाई निर्माण होऊन दुष्काळाला सामोरे जावे लागेल यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी लवकर दखल घ्यावी
**वंदना राऊत सरपंच पुरी**



या व्यवसायामध्ये शामिल असलेल्या २७ लोकांना नोटीस दिल्या आहे तसेच तीन लोकांवर बोज्या टाकण्याची कारवाई सुरू केली आहे आता यापुढे उत्खन होऊ नये यासाठी प्रशासनाचा पाहरा या ठिकाणी असणार आहे तसेच गावातील तरुण मुलांची समिती तयार करून त्यांची देखील मदत आम्ही घेणार आहोत व आता कोणत्याहीच पद्धतीने अवैध्द वाळू उपसा होणार नाही यासाठी प्रयत्न आम्ही करणार आहोत
**सतिश सोनी तहसीलदार**

# कुणबी मराठा महासंघाच्या तालुकाध्यक्षपदी रोहन गलांडे ! समाज सेवेची दखल घेत करण्यात आली निवड

**केज प्रतिनिधी**

अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य रोहन गलांडे पाटील यांनी आतापर्यंत निस्वार्थपणे केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद गुळमिले पाटील यांच्या सूचनेवरून व बीड लोकसभा अध्यक्ष रमेश साखरे यांच्या सुचनेनुसार अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या केज तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली रोहन दादा गलांडे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या माध्यमातुन समाजातील विविध प्रश्न लोकशाही मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करत अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाची विचारधारा व कार्यपध्दती यशस्वीपणे पार पाडेल असे मत रोहन गलांडे पाटील यांनी व्यक्त केले तसेच संघाच्या निवड पत्रात असे म्हटले आहे की अपेक्षा करत सदर नियुक्ती ही नियुक्ती दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल.अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे नियम व अटीच्या अधिन राहुन आपण काम करेन असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तरी रोहन गलांडे पाटील यांचे विविध स्तरांवरुन अभिनंदन करण्यात येत आहे तरी रोहन गलांडे यांनी असे म्हटले आहे की सकल मराठा समाजा साठी तीळ भर आजपर्यंत समाजासाठी काम करत अलेलोच आहे, आणि इथून पुढेही करतच राहणार, समाजासाठी कधीही हजर राहणार, तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवून मला अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष पद देवून माझ्यावर जबाबदारी टाकली आहे, त्या जबाबदारीला कर्तव्य समजून सकल मराठा समाजसाठी कामकरणार हे आज मी सकल मराठा समाजला वचन देतो. तुम्ही माझ्यावर प्रेम दाखवल त्याबद्दल अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा आभारी आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

# आय जी पदाचा अतिरिक्त पदभार रंजन कुमार शर्मा यांच्याकडे.



**नाशिक प्रतिनिधी**

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बी.जी .शेखर हे शुक्रवारी( 31 मे) सेवानिवृत्त झाले .त्यामुळे रिक्त झालेल्या नाशिक एस आय जी पदाचा अतिरिक्त कार्यभार राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील आर्थिक गुन्ह्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. राज्य महासंचालक कार्यालयातील आस्थापना विभागाने या संदर्भात आदेश दिले आहेत.

# नवीन सरकार येईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार, निवडणूक आयोगाकडून घोषणा

**नाशिक प्रतिनिधी**

राज्यातील ४८ लोकसभेच्या जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली असून आता निवडणूक आयोगाने आचारसंहिता शिथिल करावी अशी मागणी सरकारने केली होती. यावर निवडणूक आयोगाची प्रतिक्रिया आली आहे .नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. तरी आदर्श आचारसंहिता अद्याप पर्यंत सुरू असून त्यात कोणत्याही प्रकारची शिथीलता देण्यात आलेली नाही. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचार संहिता कायम राहणार असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रका द्वारे कळविले आहे. आचार संहिता कालावधीत जर एखादे अत्यंत तातडीचे प्रकरण असल्यास आचारसंहितेतून सूट देऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशी प्रकरणे निवडणूक आयोगास शिफारस करण्यासाठी या कार्यालयाच्या २८ फेब्रुवारी २०२४ च्या परिपत्रकांवर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने शिफारस केलेले प्रस्ताव या कार्यालयामार्फत




भारत निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. लोकसभा निवडणूक २०१४ च्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंतच्या कालावधीत अशा एकूण ५९ प्रस्तावावर भारत निवडणूक आयोगाने निर्णय दिलेला आहे. तरी आचारसंहिता कालावधीत आचारसंहितेचे कटाक्षाने पालन केले पाहिजे याची सर्व संबंधिताद्वारे दक्षता घेण्यात यावी. भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ च्या परिपत्रकांन्वे देशात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित करून आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. आदर्श आचारसंहिता कालावधीमध्ये काय करावे व काय नाही करावे याबाबतच्या तसेच इतर विविध विषयाबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना भारत निवडणूक आयोगाच्या २ जानेवारी २०२४ च्या एकूण आठ पत्रानवे स्वतंत्ररीत्या देण्यात आले आहेत .सदर सूचनाचे कटाक्षाने पालन करावे निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या पाच मार्च २०२४ आणि ७ मार्च २०२४ या पत्राद्वारे सर्व संबंधित यंत्रणा सूचना देण्यात आलेले आहेत. नाशिक व कोकण विभागातील महाराष्ट्र विधान परिषदेतील दोन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदार संघाच्या सदस्यांचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. सदर रिक्त होणाऱ्या पदासाठी भारत निवडणूक आयोगाने २४ मे २०२४ रोजीच्या परिपत्रकांवर निवडणूक कार्यक्रम घोषित केला असून प्रसिद्धी पत्रक जारी केलेल्या दिवसापासून संबंधित मतदार संघात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. या कालावधीत पालन करावयाच्या आदर्श आचारसंहिते बाबतच्या सविस्तर सूचना भारत निवडणूक आयोगाच्या सव्वीस डिसेंबर २०१६ च्या पत्रामध्ये देण्यात आले आहेत. सदर सूचनाचे कटाक्षाने पालन करण्यात येईल याची सर्व संबंधिताद्वारे दक्षता घेण्यात यावी असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# फौजी तानाजी कासारे यांचा नागरी सत्कार:सेवा निवृत्ती निमित्त दिले

गांगलगाव येथील भारत मातेचे सुपुत्र,तानाजी कासारे यांचा गावकरी मंडळी कडून, मोठ्या थाटात नागरी सत्कार करण्यात आला.

फौजी तानाजी कासारे यांचे प्राथमिक शिक्षण गावातील सावित्रीबाई फुले विद्यालयात झाले असून, २००२ साली ते भारत मातेच्या सेवेत दाखल झाले.त्यांची पहीली पोस्टीग पंजाब येथे, त्यानंतर मिझोरम,आसाम, राजस्थान पं.बंगाल,ओरिसा जम्मू- काश्मीर या ठिकाणी त्यांनी तब्बल २२ वर्ष डोळ्यात तेल घालून भारतमातेची अखंड सेवाकेली. दरम्यान,फौझी तानाजी कासारे यांची नुकतीच सेवानिवृत्ती झाली असून, दिनांक २३ मे रोजी गांगलगाव येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी, ढोल-ताशाच्या गजरात त्यांची पद मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक घरा समोर महिला व पुरुष्यांनी त्यांचे शाल-श्रीफळ व पुष्प गुच्छ देउन, आदरणीय स्वागत केले. यावेळी संपूर्ण गाव देश भक्तीत निनादून गेले.

दरम्यान, पद मिरवणूक संपल्यानंतर सर्व समाज बांधवांना सुग्रास स्नेह भोजन देण्यात आले.

सदर सत्कार सोहळा, अशोका मित्रमंडळ व अण्णा भाऊ साठे मित्रमंडळ तसेच, गावातील सामाजिक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेऊन यशस्वी केला.

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नवीन पोलीस आयुक्त संदीप भीमराव पाटील

**छ.संभाजीनगर प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर दि १जून २०२४ जिल्ह्याचे नवीन पोलीस आयुक्त संदीप पाटील यांचे शिक्षणसाताराच्या सैनिक स्कूलमध्ये झाले.त्यांचे मुळगाव येलूर तालुका वाळवा जिल्हा सांगलीआहे. संदीप पाटील यांनी पुढे NDA मध्ये जाण्याचे ठरवले होते पण फिजिकल मध्ये ते पास होऊ शकले नाही म्हणून त्यांनी पुढे इस्लामपूर मधून मेकॅनिकल इंजिनिअरिंग मध्ये ग्रॅज्युएशन पूर्ण केले.पण सैनिक स्कूल मध्ये असल्यापासून वर्दीबद्दल असलेले प्रेम संदीप पाटील यांना स्वस्थ बसू देत नव्हते म्हणून त्यांनीयूपीएससीचा अभ्यास सुरू केला. शिस्तबद्ध नियोजन ,कठोरमेहनत व जे करायचे ते परफेक्ट करायचे या प्रेरणेतून संदीपपाटील २००५ ला १६१ व्या रँकनी IPS झाले, संदीप पाटीलयांना NDA मध्ये अपयश आले व ते सिव्हिल सर्विस मध्ये आले कारण नियतीने त्यांना लोकसेवेसाठी निवडले होते. IPS संदीप पाटील यांची पहिली पोस्टिंग वयाच्या २६ व्यावर्षी चंद्रपूरला झाली, त्यानंतर परभणीचे पोलीस अधीक्षक असताना त्यांनी स्वतःहून गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक पद मागून घेतले.गडचिरोलीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकमराठी तरुण पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्त झाला होता,गडचिरोलीत माओवादी विचारसरणीला छेद देण्यासाठी संदीप पाटील यांनी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये लायब्ररी सुरुकेली.त्यामुळे तेथील भरकटलेला तरुण स्पर्धा परीक्षेच्यामाध्यमातून मुख्य प्रवाहात आला बुके नको बुक द्या यात्यांच्या आव्हानाला प्रचंड प्रतिसाद मिळाला; पुढे साताऱ्याचे एसपी असताना दहा हजार पुस्तके गोळा करून ती गडचिरोलीला पाठवली व लायब्ररीच्या कार्याला चालनादिली. पुणे जिल्हा ग्रामीणचे SP असताना संदीप पाटील यांनीभीमा कोरेगाव प्रकरण असो, मराठी क्रांती मोर्चा असो या सर्वपरिस्थिती सक्षमपणे हाताळल्या. पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांना मनासारखी बदली, कामातून थोडा दिलासा व ड्युटी मध्ये सुलभता देऊन संदीप पाटील यांनी आपलाही कोणी विचार करणारा आहे असा विश्वास कर्मचाऱ्यात निर्माण केला.आज संदीप पाटील हे छत्रपती संभाजीनगर च्या पोलीस आयुक्तपदी आले आहेत.




# प्रत्येकाने मिळालेल्या संधीचं सोनं करून सेवा करावी-सभापती गोवर्धन सानप

**/शिरूर कासार । प्रतिनिधी**

प्रत्येकास देव सर्वांना संधी देतच असतो फक्त आपण मिळालेल्या त्या संधीचं सोनं करता आलं पाहिजे आणि राहिलेल्या उर्वरित आयुष्याच्या काळात आपण सुख समाधानी आरोग्यमय जीवन जावो अशा भावना पाटोदा येथील सभापती गोवर्धन सानप यांनी शिरूर कासार येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असलेल्या सखाराम तुपे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून एस एस शिंदे पाटोदा एस एस जायभाय अमळनेर बाळू जायभाय रोपाल कैलास इंगळे शाखाधिकारी हरिभाऊ ढाकणे ज्येष्ठ पत्रकार त्याचा प्राचार्य तुकाराम तुपे शिरूर शाखाधिकारी देशपांडे साहेब आधी उपस्थित होते

वयोमाना परत हे सखाराम तुपे यांना ३१ मे रोजी सेवापूर्ती सोहळा साजरा करण्यात आला होता याप्रसंगी बोलताना गेल्या अनेक वर्षांपासून सखाराम तुपे ही जिल्हा सहकारी बँकेत असताना विविध विषयाचे ज्ञान असल्याने त्यांनी कधीच कोणाची अडचण केली नाही सर्वांना समान वागणूक देऊन आपल्या सर्व सहकार्याशी हसत खेळत सर्वांना सोबत घेऊन आपला कार्यकाल पूर्ण केला आपल्या कार्य काळामध्ये त्यांनी कधीच कोणाला दुखावले नसल्याचे यावेळी बोलताना पाटोदा येथील प्राचार्य तथा दैनिक झुंजार नेताचे ज्येष्ठ पत्रकार तुकाराम तुपे यांनी यावेळी बोलताना आपले मनोगत व्यक्त केले

माझे आणि सखाराम तुपे यांची जवळपास १५ ते २० वर्षे सोबत असल्याने त्यांचा स्वभाव



काम करण्याची पद्धत चांगली ठाऊक आहे तेव्हा उर्वरित काळ सुख समाधानाचा जावा असे शाखाधिकारी सुनील खाडे यांनी म्हटले आहे

काहींनी त्यांच्या व्यंगावर बोट ठेवून त्यांचा विपर्यास केला परंतु हा प्रसंग बोलण्याचा नव्हता असेही यावेळी काहींनी म्हटले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखाधिकारी सुनील खाडे यांनी तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ तपासणी कैलास इंगळे यांनी मानले

या कार्यक्रमास देशपांडे साहेब भिलारे साहेब बंडू सोनवणे अन्वर बेक सोनू मानकर संतोष दुधकर रावतळे पोलीस मॅडम भगवानराव तरटे रब्बानी सय्यद राजू गवळी शेषराव पाखरे दोडके मॅडम चेअरमन भगवान ढाकणे हरिदास मावशी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी हा कार्यक्रम हसत खेळत सर्वांना अल्पपोहार व चहा देऊन सांगता करण्यात आली

# रमेश आडसकर यांच्या वाढदिवसानिमित्त किराणा किट सह रुग्णांना फळ वाटप करुन वाढदिवस केला साजरा

**प्रतिनिधि/केज**

सध्या वाढदिवस म्हटले की मोठ मोठे बॅनर बाजी करणे केक तोफा फटाके या गोष्टीवर प्रचंड प्रमाणात व्यर्थ पैसा खर्च होतो त्याला फाटा देत आंबा साखर कारखान्याचे संचालक मिनाज पठाण यांनी गोरगरीब जनतेसोबत आपले नेते रमेशरावजी आडसकर यांचा वाढदिवस साजरी केला केज , माजलगाव मतदार संघाचे भाजपाचे नेते रमेशराव आडसकर यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय केज येथे रुग्णांना केळी, सफरचंद,पाणी बॉटल व पालावरील हतावर पोट असणाऱ्या गोरगरीबांना किरणा किटचे वाटप करुन लाडक्या नेत्याचा वाढदिवस, सोनिजवळा येथील अंबा साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिनाज पठाण यांनी रमेशराव आडसकर यांचा वाढदिवस साजरा केला या बाबत सविस्तर वृत्त असे की माजलगाव मतदार संघाचे नेते रमेश आडसकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रामीण रुग्णालय केज येथील रुग्णांना फळ व पालावरील लोकांना किराणा किटचे वाटप करण्यात आले या वेळी केज ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ केंद्र सर, डॉ , इंगोले सर, डॉ नागरगोजे सर, पत्रकार दशरथ चवरे, रमेश गुळभिले, रामदास तपसे , धनंजय कुलकर्णी, रंजित घाडगे, मुबशीर खतीब,सनी शेख, ग्रामपंचायत सदस्य





देवीदास जोगदंड, सेवा सहकारी सोसायटी चे व्हाइस चेअरमन, हुसेन पटेल, आसेफ पठाण, योगिराज काळे, पप्पु पवार व ईतर उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे आयोजन मिनाज पठाण यांनी केले होते तर आभार देविदास जोगदंड यांनी केले

मिनाज पठाण यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की मला गोरगरीब हातावरची पोट असणारे मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवणारे तसेच उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी सुद्धा ग्रामीण भागातील गोरगरीब लोक त्यांना डब्याची ही सोय कमी जास्त प्रमाणात होत असते त्यामुळे एक वेळचं का होईना वाढदिवसानिमित्त आपण फळ वाटप करून हातावरचे पोट असणारे मजूर लोकांना दोन-चार दिवसाचा किराणा दिला त्यात आपल्याला आनंद मिळाला व खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरी झाला अशी भावना व्यक्त केली

# सिद्धनेर्ली येथील यशश्री क्लासेसचा शंभर टक्के निकाल




**प्रतिनिधि/कुडूत्री** गेली सलग पंधरा वर्ष शंभर टक्के निकालाची परंपरा जोपासणाऱ्या यशस्वी क्लासेस सिद्धनेर्लीचा यावर्षीचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. इयत्ता दहावी मध्ये ५० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यामधील २३ विद्यार्थ्यांना ८५% हून अधिक गु ण मिळाले आहेत. क्लास मधून प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे समर्थ ठाणेकर ९२.८०%, अथर्व आकुर्डे ९०.६०% इशान मगदूम ९०.२०% आदी.यशश्री क्लासेस मध्ये गेल्या पंधरा वर्षापासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मराठी व सेमी इंग्रजी माध्यमाचे उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते. या क्लास मधून आज अखेर मार्गदर्शन घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी वैद्यकीय व इंजीनियरिंग क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळवलेला आहे.सदर विद्यार्थ्यांना क्लासचे संचालक व्ही. डी. मोरबाळे, मोरबाळे मॅडम, संतोष घुणके,माधुरी कांबळे, उमेश बेनके आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# पैठण मध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य दुचाकी चारचाकी रॅली

**दैनिक वादळ वार्ता पैठण/ चैताली औटे**
पैठण येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई देवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्त भव्य दुचाकी ,चारचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी उत्पन्न बाजार समिती येथून रॅलीला सुरुवात झाली .खंडेराय मंदिरात दर्शन घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदू शिरोमणी महाराणा प्रताप व छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या रॅलीमध्ये १०७ दुचाकी व १७ चार चाकी धारक सहभागी झाले होते .राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो, येळकोट येळकोट जय मल्हार, छत्रपती शिवाजी महाराज की जय ,अशा घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीचे अध्यक्ष आदित्य आदमाने यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्राध्यापक संतोष तांबे यांनी ऐतिहासिक कार्याला उजाळा देताना एकीकडे काळानुरूप बदल होत चालला आहे आपण गुलामीकडे जाऊ नये म्हणून राजमाता अहिल्यादेवी यांचे विचार आत्मसात करून व ते प्रत्यक्षात कृतीत आणून ते विचार जगले पाहिजे .धर्म, जात पंथ या पलीकडे जाऊन समाजकार्य करून अहिल्याबाई होळकर यांनी खूप मोठे उदाहरण समाजापुढे ठेवले आहे असे ते म्हणाले. यावेळी धोंडीराम वाघे ,डॉ पंडित किल्लारीकर,अरुण कुमार बल्लाळ ,साईनाथ सोलाट, बालाजी नलभे, साईनाथ व्होरकटे ,बंडू महाराज गाडे, मिठू नन्नवरे, सोमनाथ नजन, आप्पासाहेब वीर, विशाल वाकचौरे ,आप्पासाहेब सोलाट, डॉ धनंजय अर्जुन ,पांडुरंग मोरे, गणेश वाघमारे ,महेश गाडे, अँड. बद्रीनाथ चोरमारे, अरुण बल्लाळ, दीपक वीर, दत्तात्रय मस्के ,महादेव खंडागळे, बापूसाहेब वीर ,एकनाथ मिसाळ, वसंत चोरमले ,संतोष सरोदे ,लक्ष्मण गलांडे, काकासाहेब भावले, धनाजी सूर्यवंशी, गोविंद तुरनर ,विष्णू सुडके ,बाळासाहेब गाडे ,रामेश्वर पाचे ,शिवाजी सरगर ,जगदीश वीर



,दामोदर गांगले ,लालू वीर, तुषार मिसाळ ,संकेत मिसाळ, आदेश गांगले सोमनाथ वीर, सिद्धार्थ बागुल आदींसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन छत्रपती संभाजी नगर जिल्हा ग्रामसेवक पतसंस्थेचे माजी चेअरमन जिजाभाऊ मिसाळ यांनी केले.

## मान्सून दहा जून पर्यंत महाराष्ट्रात सक्रिय होणार



**(पुणे प्रतिनिधी)**मान्सूनचे आगमन कधी होणार याची चातक पक्षा प्रमाणे सर्वच जण वाट पाहात होते. त्यांची ही प्रतिक्षा आता संपली आहे. अखेर मान्सूनचे केरळमध्ये आगमन झाले आहे. केरळच्या कोट्टयम जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. हा मान्सूनचा प्रवास आता तसाच पुढे होणार आहे. केरळ प्रमाणेच इशान्य भारतातही पाऊस हजेरी लावणार आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसापासून हैराण झालेल्यांना दिलासा मिळाला आहे. आता महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन कधी होणार याची प्रतिक्षा आहे. भारतीय हवामान विभागाने ३१ मे रोजी मान्सून केरळ मध्ये दाखल होण्याचा अंदाज वर्तवला होता. मात्र एक दिवस आधीच मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. केरळ मध्ये दाखल झालेला मान्सून पुढील दहा दिवसात महाराष्ट्रात दाखल होण्याचा अंदाज आहे. केरळमध्ये दाखल झालेल्या या मान्सूनचा प्रवास पुढे केरळ कर्नाटक महाराष्ट्र असा होणार आहे. त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजानुसार महाराष्ट्रात मान्सून १० जूनला दाखल होईल.

# अंबाजोगाई येथील संगीन मस्जिद इनामी जमीन विक्री प्रकरणी वफ्फ बोर्डाच्या चेअरमन कडे मनसेची तक्रार!

**खरेदी विक्री करणाऱ्या वर गुन्हा नोंद होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार-वर्षाताई जगदाळे**

**बीड प्रतिनिधी**



अंबाजोगाई येथील मस्जिद संगीन यांची नावे असलेली इनामी जमीन बेकायदेशीर खरेदी विक्री प्रकरणात यापूर्वीही महाराष्ट्र नवनिर्माण सेने कडून तक्रार देण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगर येथे वफ्फ बोर्डाच्या कार्यकारी अधिकारी यांच्याकडे कारवाई करण्यासंदर्भात संपूर्ण कागदपत्रासह तक्रार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वफ्फ बोर्डाचे चेअरमन यांची छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन अज्ञात इसमा विरोधात तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदन दिले आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मंदिर, मज्जिद व दर्गा यांच्या जमिनीवर भूमाफियांनी अवैधपणे कब्जा करत खरेदी विक्री सुरु केलेली आहे. सन १९७४ ला सांगीन मस्जिद दर्ग्याला तब्बल २७६ एकर १८ गुंठे जमीन सेवेसाठी बहाल करण्यात आली होती. ही जमीन सर्वे नंबर १० मध्ये येते. इनामी जमिनीचा नोंद पत्रक नमुना ९ मध्ये नोंदणीकृत असताना संबंधित व्यक्तींनी बेकायदेशीर या जमिनीची खरेदी विक्री केलेली आहे. या संदर्भातील सर्व पुरावे वफ्फ अधिकारी व वफ्फ बोर्डाचे चेअरमन यांच्याकडे देण्यात आले आहे. संबंधित जमिनीवर अतिक्रमण करत प्लॉटिंग करणाऱ्या विरोधात तत्काळ कायदेशीर कारवाई करावी ही जागा सर्वे नंबर २१०,२१८,१४०, १४२,३०८,३०९,३२९,३४४,३४५,३८३ आढळून येते. बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी इनामी जमीन खरेदी विक्री बॉण्ड वर झालेली आहे. बीड जिल्ह्यातील वफ्फ अधिकारी व सदस्य हे काय करत आहेत. अंबाजोगाई येथील प्रकरण अत्यंत गंभीर असून छत्रपती संभाजी नगर येथील वफ्फ कार्यालयात यापूर्वीही मनसेच्या वतीने कारवाई करण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. वफ्फ बोर्डचा संपूर्ण कारभार व देखरेख ची जबाबदारी असणारे विधान परिषद आमदार व चेअरमन यांच्याकडेही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वर्षाताई जगदाळे यांनी निवेदन दिले आहे. येत्या पंधरा दिवसात या प्रकरणात कायदेशीर कारवाई न झाल्यास वफ्फ अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर मनसे घंटा नाद आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.

# अनुदानित युरिया खताची चोरुन विक्री करणाऱ्या सोनेरी टोळक्याला त्रिमूर्ती सरकारचे अभय का ? वसंत मुंडे

परळी (प्रतिनिधी ) शेतकऱ्याला प्रत्येक वर्षी पेरणीसाठी युरिया खताची गरज मोठ्या प्रमाणावर लागते. परंतु पेरणीच्या वेळेसच अनुदानित युरिया खताची टंचाई निर्माण होते कारण अनेक खाजगी कंपन्या चोरून अनुदानित युरिया खताचा पुरवठा खाजगी उद्योगांना पुरवतात, त्यांचे मंत्रालया पासून कृषी खात्याच्या वरिष्ठांशी आर्थिक व्यवहाराचे लागेबंध असल्यामुळे युरिया खताची टंचाई निर्माण करून शेतकऱ्याला युरिया न मिळवून देणारे मोठे सोनेरी टोळक्याचे हात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. केंद्र सरकारच्या निदर्शनास युरिया खताची चोरी होते असे लक्षात आल्यावर तात्काळ भारत सरकारच्या रसायने, खते मंत्रालयाकडून सर्व राज्य सरकारला आदेश पारित केले परंतु महाराष्ट्र राज्यातील कृषी विभागाच्या निविष्ठा गुण नियंत्रण दक्षता पथकाकडून राजकीय हस्तक्षेपा मुळे कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . १० लाख टन युरिया चा वापर चोरून खाजगी उद्योग प्लाऊड,मोल्डिंग, पावडर ,पशुखाद्य ,दुग्ध व्यवसाय, कॉंक्रिटीकरण व औद्योगिक खाणींचे स्फोटके तयार करण्यासाठी युरियाचा वापर केला जातो. प्रत्येक वर्षी १० लाख टनाचा औद्योगिक युरियाचा वापर राज्यात होतो, युरियासाठी सरकारकडून ६००० कोटी रुपयाची



सबसिडी दिली जाते. महाराष्ट्रामध्ये अनुदानित युरिया खताचा खूप मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असून सर्व स्तरावर आर्थिक व्यवहाराचे लागे बंद असल्यामुळे कृषी विभागाचे अकार्यक्षम निविष्ठा गुण नियंत्रण दक्षता पथकाकडून कारवाई केली जात नाही. युरिया खताचा काळाबाजार व शेतीव्यतिरिक्त इतर औद्योगिक कामासाठी वापर केला जातो असे केंद्र सरकारच्या निदर्शनास दिनांक १०/२/२०२३ ला माहिती मिळताच युरिया खताचे तस्करी रोखण्यासाठी विविध औद्योगिक अकृर्षक उद्योगाची माहिती घेऊन सखोल चौकशी करून दोषीशी उत्पादक व पुरवठा करणाऱ्या यंत्रणेवर खत नियंत्रण आदेश १९८५ व जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वे तात्काळ कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश केंद्र सरकारकडून राज्य सरकारला पारित केले असून ही त्रिमूर्ती अकार्यक्षम राज्य सरकारकडून आज तागायत गांभीर्याने कारवाई केली जात नसल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला .

# सामाजिक सलोखा व शांतता राखावी पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांचे आवाहन; होळमध्ये शांतता समितीची बैठक

**प्रतिनिधी/केज**
लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून शांतता राखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आपणही प्रतिसाद द्यावा. गावात सामाजिक सलोखा व शांतता राखा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांनी केले आहे. युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतील होळ (ता.केज) येथे शनिवारी (दि.१) हनुमान मंदिरात शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी श्री.पतंगे हे बोलत होते. व्यासपीठावर सरपंच पुत्र योगेश शिंदे, उपसरपंच बाळासाहेब घुगे, ग्रामपंचायत सदस्य तानाजी शिंदे हे होते. पुढे बोलताना पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे म्हणाले, युसुफवडगाव पोलीस हद्दीत सहायक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलिसांना यश आले आहे.



होळ पंचक्रोशीतील नागरिकांनी सलोख्याची भूमिका घेतली आहे. ती यापुढेही कायम ठेवावी. सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात, तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांनी दिला आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक पतंगे, सहायक पोलीस उपनिरीक्षक रमेश सिरसाट, पो.हे.कॉ.भगवान खेडकर, पो.कॉ.कोंडीबा मेहत्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नुरा शेख यांचा सेवापूर्ती कार्यक्रम उत्साहात संपन्न



श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक नुरा शेख यांचा सेवापूर्ती कार्यक्रम जासई येथे महाविद्यालयात मोठया उत्साहात संपन्न झाला. भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सेवापूर्तीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी उरण तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातून अनेक मान्यवर उपस्थित होते. रयत बँकेचे संचालक व वाशी बँकेचे चेअरमन किशोर पाटील, नितीन ठाकूर, विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, आदी मान्यवरांनी नुरा शेख सरांना

# एमएनजीएल आणि समर्थ युवा फाउंडेशनच्या दुसऱ्या मोबाइल मेडिकल व्हॅनचे लोकार्पण चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा

**(पुणे प्रतिनिधी)**
पुणे येथे एमएनजीएल आणि समर्थ युवा फाउंडेशनच्या दुसऱ्या मोबाइल मेडिकल व्हॅनचे लोकार्पण केले. पुणेकरांच्या उत्तम आरोग्यासाठी समर्थ युवा फाउंडेशन आणि एमएनजीएलच्या मोबाइल मेडिकल व्हॅनसारखे उपक्रम अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. समर्थ युवा फाउंडेशनची ही मोबाइल व्हॅन पुणे शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांत सेवा देणार असून, या व्हॅनच्या माध्यमातून महिलांमधील स्तनांचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग, रक्तदाब, रक्तातील घटक, कोलेस्टेरॉल, डोळे, दात, रक्त, आरोग्य, रक्तातील साखर आदी तपासण्या करून; तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अहवाल दिला जाईल.




दरम्यान, समाजातील प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांना आवश्यक पाठबळ उपलब्ध करून देण्याची ग्वाही या वेळी दिली. या प्रसंगी समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, एनवायसीएसचे अध्यक्ष तथा समर्थ युवा फाउंडेशनचे विश्वस्त प्रकाश साहू, एमएनजीएलचे संचालक कुमार शंकरजी, सीएसआरचे बागेश्री मंठाळकर, माजी आमदार दीपक पायगुडे, डॉ. आशीष घोष, डॉ. रत्नदीप जाधव, भाजपा कोथरूड मंडल दक्षिणचे अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, उत्तरचे अध्यक्ष सचिन पाषाणकर यांच्यासह इतर मान्यवरही उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )